# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

छाननी व तालिकीकरण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.:२०२५६२१३९८
Website:www.unipune.ac.in

Scrutiny & Tabulation Section
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621398
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एस अॅण्ड टी/४२९ दिनांक : ०९.०६.२०२०

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय :** कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या, द्वितीय सत्रातील ऑनलाईन परीक्षांचे गुण नोंदविण्याबाबत.

**संदर्भ :** विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक ९३, दिनांक १६ मे, २०२०.

कोरोना (Covid -19) च्या प्रादुर्भावामुळे, लागू करण्यात आलेल्या संचारबंदीमुळे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या, द्वितीय सत्रातील अभ्यासक्रमात नमूद सर्व विषयांच्या ५० गुणांच्या ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या इनसेम परीक्षा होऊ शकल्या नाहीत. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, या सर्व विषयांच्या इनसेम परीक्षेचे गुण हे अंतर्गत मूल्यमापनाद्वारे नोंदविण्यात यावेत. हे अंतर्गत मूल्यमापन महाविद्यालय स्तरावर पूर्वीच केलेले अंतर्गत मूल्यमापन, जर्नल्स, टर्म वर्क, मौखिक परीक्षा, टयुटोरियल्स यापैकी एक अथवा अनेक तरतुदींच्या आधारावर करण्यात यावे.

मा. प्राचार्य यांनी त्यांच्या महाविद्यालयातील संबंधित विषय शिक्षकांची अंतर्गत परीक्षक म्हणून नेमणूक करावी, व या शिक्षकांना त्यांच्या बिसीयुडी लॉगिनमधून, सर्व विद्यार्थ्यांचे, सर्व विषयांमध्ये मिळालेले ५० पैकीचे गुण हे विद्यापीठाच्या इंटर्नल मार्क्स लिंकचा (intmark.unipune.ac.in) उपयोग करून दि. १५ जून, २०२० पर्यंत नोंदवण्याबाबत सूचित करावे, ही विनंती.

कळावे,

(महेश काकडे)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

C:\Users\Exam\Documents\letters 2020.docx